**शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**परिपत्रक महसूल व वन विभाग,**

**शासन निर्णय : क्रमांक एलईएन १०/२००१ / प्र.क्र.२२२/ज-१**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दि. १४ ऑगस्ट, २००१.**

**वाचावे:-** १) शासन निर्णय क्र.महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन १०९०/प्र.क्र.१७२/ज-१ दिनांक २८.११.१९९१.

२) शासन निर्णय क्र.महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन १०९२/प्र.क्र.६५/ज-१ दिनांक २२.४.१९९२.

३) शासन निर्णय क्र.महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन १०९२/प्र.क्र.६५/ज-१ दिनांक १६.१२.१९९८.

४) शासन निर्णय क्र.महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन १०९८/१५/प्र.क्र.४६/ज-१ दिनांक २३.३.१९९९.

**परिपत्रक :-**

शासकीय गायरान / पड जमिनीवरील दि.१.४.१९७८ ते दि.१४.४.१९९० या कालावधीत झालेली व दि. १४.४.१९९० रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे शासन निर्णय दि.२८.११.१९९१ व शासन परिपत्रक दि. २२.४.१९९२ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या अतिक्रमणदारांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या सुचना दि. १६.१२.१९९८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.तसेच शासन परिपत्रक दि.२३.३.१९९९ अन्वये शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात आलेले होते. तथापि प्रत्येक जिल्हयात उपरोक्त कालावधीमधील नियमानुकूल करण्याबाबतची बरीच प्रकरणे अद्यापि प्रलंबित असल्याचे लोकप्रतिनिधीनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

२. संदर्भाधिन शासन निर्णय क्र.१ प्रमाणे शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण करणे आवश्यक होते.तथापि प्रदीर्घ कालावधी लोटूनही याबाबतच्या प्रकरणांत अद्यापि निर्णय घेण्यात आलेला नाही.तेंव्हा याबाबत आता पुन्हा असे आदेश देण्यात येते की, शासन निर्णय दि.२८.११.१९९१ व शासन निर्णय दि.२२.४.१९९२ मधील अटी व शर्तीनुसार शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची कार्यवाही अद्यापही प्रलंबित आहे. अशा प्रकरणी अशी अतिक्रमणे तीन महिन्याच्या आत नियमानुकूल करण्याची कार्यवाही सर्व जिल्हाधिका-यांनी अग्रक्रमाने करावी. तसेच सर्व विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागातील प्रलंबित प्रकरणाबाबत मासिक बैठकीत आढावा घेऊन त्याबाबत पाठपुरावा करावा. व कार्यवाही पूर्ण केल्याचा अहवाल शासनास

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
24 AUG 2001
SEP 2001

तात्काळ पाठवावा. शासनाच्या धोरणानुसार अपात्र ठरणारी अतिक्रमणे तात्काळ काढून टाकण्याची कार्यवाही वरील मुदतीत पूर्ण केली जाईल , याबाबत दक्षता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.२८.११.१९९१ मध्ये नमूद केलेल्या निकषामध्ये अपात्र ठरणारी अतिक्रमणे का अपात्र ठरतात त्याची कारणमीमांसा देणारी वर्गवारी करुन प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, जेणेकरुन त्यावर विचार करुन धोरणात्मक निर्णय घेणे शासनास शक्य होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रमाकांत असमर)**

सह सचिव.

महसूल व वन विभाग.

प्रति